केंद्र शासनाच्या मंजूरीस अनुसरुन ८२ उपकेंद्रे स्थापन करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन,**
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. पीएचसी २००५/प्र.क्र. २४७/आरोग्य ५.
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० मे, २००६.

वाचा :- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी १०९७/२८६/प्र.क्र.२६/आ.४, दि.१.१.९६.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी १०९७/२८६/प्र.क्र.२६/आ.४, दि.२६.१२.९७.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी १०९७/२८६/प्र.क्र.२६/आ.४, दि.१६.१.०३.

४) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचे पत्र क्र.जी-२३०११/१६/२००२-पीए (व्हल्यू-२), दि. ६/२/२००४ व क्र झेड-२३०१८/ १/२००४/पीए, दि. ऑगस्ट, २००४.

५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी १००१/३४९/प्र.क्र.१४४/०१/आ.५, दि.३० मार्च, २००५.

६) संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई ह्यांची पत्रे
   १) क्र.संआसे/निविमु/कु.क.उपकेंद्र/टे-७/कक्ष ७ अ/०६, दि.२.२.२००६
   २) क्र.संआसे/निविमु/कु.क.उपकेंद्र/टे-७/कक्ष ७ अ/०६, दि.२१.२.२००६

**<u>प्रस्तावना</u> :** सन १९९१ च्या लोकसंख्येच्या आधारावर आदिवासी, बिगर आदिवासी तसेच डोंगरी क्षेत्रात विहित निकषानुसार मंजूर करावयाच्या आरोग्य संस्थांच्या संख्यात्मक बृहत आराखड्यास शासनाने वरील संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. त्यानंतर वरील संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.२६.१२.९७ च्या शासन निर्णयान्वये प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालये या आरोग्य संस्थांची स्थान निश्चिती करण्यात आली आहे. परंतु उपकेंद्रांच्या बाबतीत दिनांक १/१/१९९६ च्या शासन निर्णयान्वये केवळ संख्या निश्चिती करण्यात आली आहे. दरम्यान राज्यातील विविध विकास क्षेत्रातील अनुशेष ठरविण्याच्या दृष्टीने विकासाचे तौलनिक स्तर, अनुशेष व प्रादेशिक असमतोल दूर करणे यासंबंधात स्थापन करण्यात आलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने त्यांचा अहवाल सन १९९७ मध्ये सादर केला. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालये या आरोग्य संस्थांच्या स्थापनेचा विभागवार आणि जिल्हानिहाय अनुशेष ठरविण्यात आला. केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील पत्रान्वये या राज्याकरिता ८०८ उपकेंद्रे मंजूर केली. त्यापैकी ७२६ उपकेंद्रे संदर्भ क्र.५ येथील दि.३०.३.०५च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली व उर्वरित ८२ उपकेंद्रांच्या स्थापनेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शाखा:
आवक क्रमांक: २००
दा
ख 20 JUL 2006

**शासन निर्णय :** संबंधीत जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांनी पारित केलेल्या ठरावानुसार करण्यात आलेल्या स्थाननिश्चितीस अनुसरुन ८२ नविन उपकेंद्रे यांची स्थापना करण्यास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे व त्यांची जिल्हानिहाय स्थान निश्चिती सोबतच्या विवरणपत्र "अ" (बिगर आदिवासी क्षेत्राकरिता ६० उपकेंद्रे, आदिवासी क्षेत्राकरिता २२ उपकेंद्रे) आणि विवरणपत्र "ब" (आदिवासी / डोंगराळ क्षेत्राकरिता ... नुसार दर्शविण्यात आली आहे.

२. उपकेंद्राकरिता पदे निर्मिती, आवर्ती, अनावर्ती खर्च इत्यादी मंजूरीचे आदेश अर्थसंल्पीय तरतूद झाल्यानंतर स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र.क.चव्हाण )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
प्रधान सचिव (कुटुंब कल्याण), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा (निविमू).
सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य), पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा (संबंधीत).
जिल्हाधिकारी (संबंधीत)
मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत)
जिल्हा आरोग्य अधिकारी (संबंधीत)
जिल्हा शल्य चिकित्सक (संबंधीत)
कार्यासन अधिकारी (अर्थ), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
अवर सचिव (सेवा २/३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
निवडनस्ती (आ-५).

शासन निर्णय सा.आ.वि.क्र. पीएचसी२००५/प्र.क्र.२४७/आ-५, दि.१० मे, २००६ चे सहपत्र

## विवरणपत्र "ब"

## उपकेंद्रांची स्थाननिश्चिती (आदिवासी / डोंगरी क्षेत्र- एकूण ६० उपकेंद्रे)

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | प्रा.आ.केंद्र | | अ.क्र. | उपकेंद्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे (५) | मुरबाड | टोकावडे | १ | १ | फांगुलगव्हाण |
| | | वसई | पारोळ | २ | २ | बिलालपाडा |
| | | डहाणू | आशागड | ३ | ३ | वरेसवाड |
| | | पालघर | मासवण | ४ | ४ | बहाडोली |
| | | शहापूर | टाकीपठार | ५ | ५ | दाढरे |
| २ | रायगड (२) | माणगांव | साई | ६ | १ | गोवेले |
| | | माणगांव | गोरेगांव | ७ | २ | देवळी |
| ३ | रत्नागिरी (४) | चिपळूण | दादर | ८ | १ | कळकवणे |
| | | संगमेश्वर | फुणगूस | ९ | २ | पोचरी |
| | | लांजा | भांबेड | १० | ३ | वेरवली खुर्द |
| | | राजापूर | जवळेथर | ११ | ४ | कार्शिंडा |
| ४ | नाशिक (६) | नाशिक | गिरणारे | १२ | १ | चांदशी |
| | | इगतपुरी | वाडीवऱ्हे | १३ | २ | मुरंबी |
| | | इगतपुरी | वाडीवऱ्हे | १४ | ३ | मोंडाळे |
| | | इगतपुरी | वाडीवऱ्हे | १५ | ४ | मुढेगांव |
| | | इगतपुरी | बेळगांव कुऱ्हे | १६ | ५ | समनेरा |
| | | इगतपुरी | बेळगांव कुऱ्हे | १७ | ६ | गोंदे |
| ५ | धुळे (३) | धुळे | आर्वी | १८ | १ | ललींग |
| | | सिंदखेडा | मालपूर | १९ | २ | कर्ले |
| | | शिरपूर | थाळनेर | २० | ३ | बाळदे |
| ५ | जळगांव (३) | चोपडा | लासूर | २१ | १ | उमर्टी |
| | | रावेर | लोहारा | २२ | २ | गारखेडा |
| | | रावेर | वाघेड | २३ | ३ | पाडळे बु. |
| ६ | अहमदनगर (४) | अकोले | लाडगांव | २४ | १ | पांगरी |
| | | | सवेशी | २५ | २ | पाचनई |
| | | | कोहणे | २६ | ३ | माहंदुरी |
| | | | कोहणे | २७ | ४ | बाभुळवंडी |
| ७ | सातारा (३) | सातारा | कुमठे | २८ | १ | पिलानी मांजरे |
| | | खंडाळा | अहिरे | २९ | २ | घावडवाडी |
| | | पाटण | हेळवाक | ३० | ३ | मारुल तर्फे पाटण |